# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०१६६/२१/अ.क्र.३३८/२५**

श्री.मंगेश बी. कदम
बिल्डींग नं.१ बी, ब्लॉक नं.११०
१ ला मजला, स्वदेशी मिल कंपाऊंड,
चुनाभट्टी (पू.), मुंबई-४०० ०२२.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प. ज. वा.) एम/प. विभाग
उप प्रमुख अभियंता (प. ज. वा.) पू.उ. यांचे कार्यालय,
परिवहन यानगृह इमारत, ५ वा मजला, पंतनगर बस डेपोच्या मागे,
घाटकोपर (पू.), मुंबई-४०० ०७५.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प. ज. वा.) पू.उ. परि-५
उप प्रमुख अभियंता (प. ज. वा.) पू.उ. यांचे कार्यालय,
परिवहन यानगृह इमारत, ५ वा मजला, पंतनगर बस डेपोच्या मागे,
घाटकोपर (पू.), मुंबई-४०० ०७५.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २०.०३.२०२५**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३-१२-२०१९ | ०९-०१-२०२० | २८-०२-२०२० | ०५-११-२०२० |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि.०९-०१-२०२० रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.०५-११-२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि.११-०१-२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.१३-१२-२०१९ अन्वये ईएस २६४ संबंधित एल विभागातील दिनांक ०१-०१-२०१८ ते १३-१२-२०१९ पर्यंतची कामाची माहिती मिळण्याबाबत मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी दि.०९-०१-२०२० च्या पत्रान्वये ४१६ पृष्ठांसाठी प्रति पृष्ठ रु.२/- प्रमाणे व ६५ फोटोसाठी प्रति कॉपी रु.१०/- प्रमाणे असे एकूण रु.१४८२/- इतकी रक्कम भरण्याचे चलन प्राप्त करुन घ्यावे. शुल्क भरल्यानंतर ७ दिवसात माहितीच्या प्रती देण्यात येतील असे कळविले.

जन माहिती अधिकारींनी माहिती निरीक्षण देवून चलन शुल्क बनवून न दिल्याने अपिलकर्तांनी दिनांक २८-०२-२०२० रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प.ज.वा.) पूर्व उपनगरे परि-5 यांनी दि.05-11-2020 च्या आदेशान्वये जन माहिती अधिकारींनी अपिलार्थीस चलन द्यावे अपिलकर्ताने अपेक्षित असलेल्या कागदपत्रांचे शुल्क महापालिकेच्या कोणत्याही कार्यालयात जमा करुन पोहोच पावती सादर केल्यानंतर 7 दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश पारित केले.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.११-०१-२०२१ रोजी जन माहिती अधिकारींकडून माहिती मिळाली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) एल विभाग उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी अपिलकर्तानी आयोगास सादर केले की, माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारींनी शुल्क भरण्यास सांगितले. चलन मिळाले नाही म्हणून प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारींनी चलन देण्याचे आदेश देवूनही चलन दिले नाही म्हणून द्वितीय अपिल दाखल केले.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (प.ज.वा.) एल विभाग यांनी आयोगास सादर केले की, विशेष मोहिम अंतर्गत दि.११-११-२०२२ रोजी अपिलकर्ताना माहिती घेण्याविषयी कळविले होते परंतु माहितीच्या पोच पावतीवर स्वाक्षरी देण्यास नकार दिला त्यामुळे माहिती नोंदणीकृत टपालाने पाठविण्यात आली आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलकर्तानी आयोगास सादर केले की, सदर माहिती अप्राप्त आहे. सदर माहिती प्राप्त करणेकरीता विहीत शुल्क भरण्यास तयार आहेत. जन माहिती अधिकारींनी चलन उपलब्ध करुन द्यावे. शुल्क भरल्यानंतर माहिती द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारींनी आयोगाचे आदेश प्राप्तीच्या ७ दिवसात अपिलकर्ताना चलन उपलब्ध करुन द्यावे. अपिलकर्तानी चलनाची रक्कम भरल्यानंतर माहिती देण्यात यावी. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
26-3-2025

**( डॉ.प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission Maharashtra

**मुंबई**
**दिनांक : २६-०३-२०२५**